## प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि. जळगाव

## शै.वर्ष -२०२५ -२०२६

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य, |
| प्रा डॉ. हेमंत पवार | प्रा डॉ एच डी जाधव |

1. प्लास्टिक मुक्त अभियान - संत सखाराम महाराज यात्रा, अमळनेर (13 मे 2025)

प्रताप महाविद्यालय अमळनेर आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने संत सखाराम महाराज यात्रेनिमित्त प्लास्टिक मुक्त अभियान भव्य स्वरूपात राबविण्यात आले. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण संरक्षणाचा संदेश यात्रेकरूंना आणि नागरिकांना पोहोचवणे हे होते. प्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. जैन आणि राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली NSS स्वयंसेवकांनी प्लास्टिकच्या हानिकारक परिणामांची जनजागृती केली. स्वयंसेवकांनी यात्रेच्या परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली. प्रा. डॉ. हेमंत पवार, प्रा. मनीष करंजे, प्रा. महादेव तोंडे आणि प्रा. सतीश पारधी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. मान्यवरांनी नागरिकांना प्लास्टिकचा वापर कमी करण्याचे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे आवाहन केले. या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.


रु सखाराम महाराज विठ्ठल रुख्मिणी संस्थान, अमळनेर
आपले हार्दिक स्वागत करीत आहे

2. सिव्हिल डिफेन्स वॉरियर नोंदणी जनजागृती कार्यक्रम

राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे विद्यार्थ्यांना सिव्हिल डिफेन्स वॉरियर म्हणून नोंदणी करण्यासाठी जनजागृती अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचे उद्दिष्ट आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रीय सुरक्षेत युवकांच्या सहभागास चालना देणे हे होते. NSS संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी सिव्हिल डिफेन्सचे महत्त्व समजावून सांगितले. समिती सदस्य डॉ. मनीष करंजे, डॉ. महादेव तोंडे, डॉ. हेमंत पवार आणि डॉ. सतीश पारधी यांनी नोंदणी प्रक्रिया तसेच स्वयंसेवकांची जबाबदारी स्पष्ट केली. NSS स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्साहाने नोंदणीची इच्छा व्यक्त केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची भावना बळकट झाली.



अमळनेर नगर परिषद, अमळनेर
सुचना/नोटीस
याद्वारे आदेशीत करण्यात येते की,
संत श्री सखाराम महाराज यात्रोत्सव सन २०२५-२०२६
बोरी नदी पात्रात विना-परवानगी पाळणे/झुले/दुकाणे
उभारण्यात येवू नये. नगरपालिकेकडे पाळणे/झुले/दुकाने
उभारणे कामी अर्ज सादर करावा. अमळनेर नगरपरिषदेची यात्रा
फि पावती भरणा केल्याशिवाय दुकाने/पाळणे/झुले उभारु नये.
लावल्यास सर्व साहित्य जमा करण्यात येवून
गुन्हा दाखल करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
मुख्याधिकारी
RANI LAKSHMIBAI MAHAVIDYALAY PAROLA
REGISTRATION FOR
CIVIL DEFENCE WARRIORS
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.
REGISTER NOW
www.mybharat.gov.in
पोलीस चौकी

3. हरित वारी उपक्रम (12 जून 2025)

12 जून 2025 रोजी NSS एककाने हरित वारी उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपणाचे महत्त्व सांगण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य डॉ. ए. बी. जैन आणि NSS संचालक डॉ. सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार आणि डॉ. प्रियांका पाटील यांच्या नेतृत्वात वृक्षारोपण करण्यात आले. स्वयंसेवकांनी काळजीपूर्वक रोपे लावून त्यांना आवश्यक ती देखभाल पुरविली. त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून वृक्ष संरक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमात 130 स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. हरित वारीने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक वृत्ती दृढ केली.


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव
व
खान्देश शिक्षण मंडळाचे
प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर
यांच्या संयुक्त विद्यमाने
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
हरित वारी-निर्मल वारी-स्वच्छ वारी-स्वस्थ वारी अभियान (निसर्गवारी)
प्लास्टीक मुक्त - थर्मोकॉल मुक्त
श्री संत सद्गुरु सखाराम महाराज पंढरपूर पायी वारी

4. तिरंगा रॅली 14 ऑगस्ट 2025 रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त NSS एककाने तिरंगा रॅलीचे आयोजन केले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, एकता आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव जागविणे हा रॅलीचा उद्देश होता. स्वयंसेवकांनी राष्ट्रीय ध्वज हातात घेऊन शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढली. देशभक्तीपर घोषणांनी वातावरण देशभक्तीपूर्ण झाले. नागरिकांनी रॅलीचे कौतुक करून सहभाग दर्शविला. स्वयंसेवकांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगणारी पत्रके वाटप केली. रॅलीचा समारोप महाविद्यालयात मार्गदर्शनपर भाषणाने करण्यात आला.



## माय विकसित भारत क्विज मास आउटरिच प्रोग्रॅम 10/10/2025

NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार आणि डॉ. प्रियांका पाटील, प्रा डॉ सुनील राजपूत  यांच्या नेतृत्वात माय विकसित भारत क्विज मास आउटरिच प्रोग्रॅम

घेण्यात आला.




GPS Map Camera
Amalner, Maharashtra, India
3332+7wc, Pratap College Campus, Amalner,
Maharashtra 425401, India
Lat 21.054248° Long 75.051806°
10/10/2025 09:38 AM GMT +05:30
Google

5. विधी जनजागृती शिबिर (16 ऑक्टोबर 2025)प्रताप महाविद्यालयातील NSS एककाने तालुका विधी सेवा समिती आणि अमळनेर बार असोसिएशनच्या सहकार्याने विधी जनजागृती शिबिर आयोजित केले. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांना कायदेशीर अधिकार, सायबर सुरक्षा आणि महिलांच्या संरक्षणाविषयी माहिती देणे हा होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वरिष्ठ सिव्हिल जज श्री. प्रविण देशपांडे होते. अ‍ॅड. आर. व्ही. निकम, अ‍ॅड. किशोर बागुल आणि अ‍ॅड. किरण पाटील यांनी सायबर गुन्हे, लैंगिक छळ प्रतिबंध कायदे आणि सुरक्षित ऑनलाइन व्यवहार याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर जागरूक राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे समन्वयक NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार होते. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात उत्साहाने सहभाग घेऊन शिबिर प्रभावी ब


तालुका विधी सेवा समिती, अमळनेर
अखिल भारतीय
जनजागृती अभियान रॅली
(PAN India Awareness & Outreach)
GPS Map Camera
Amalner, Maharashtra, India
3322+fmx, Galwade Rd, Pratap College Campus,
Amalner, Maharashtra 425401, India
Lat 21.051318° Long 75.051929°
16/10/2025 02:44 PM GMT +05:30
Google

नविले.

6. रन फॉर युनिटी (31 ऑक्टोबर 2025)

31 ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त NSS स्वयंसेवकांनी तसेच प्राचार्य डॉ एच डी जाधव व एन एस एस कार्यक्रम अधिकारी प्रा हेमंत पवार यांनी 'रन फॉर युनिटी'मध्ये सहभाग घेतला. राष्ट्रीय एकात्मता आणि ऐक्याचा संदेश देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. पहाटे स्वयंसेवक शहरातील निश्चित मार्गावर एकत्रितपणे धावले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एकात्मतेचे महत्त्व समजावून सांगितले. नागरिकांनी स्वयंसेवकांचे स्वागत करून त्यांना प्रोत्साहन दिले. उपक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय एकात्मतेवर प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त आणि टीम स्पिरिटची भावना वाढीस लागली.



7. ‘वंदे मातरम्’ सामूहिक गायन (7 नोव्हेंबर 2025)

‘वंदे मातरम्’ गीताच्या 150 वर्षपूर्ती निमित्त प्रताप महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सामूहिक गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार हा उपक्रम सकाळी 11 वाजता पार पडला. प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट समन्वयन केले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने गीतगायन करत देशभक्तीची भावना व्यक्त केली. शिक्षकांनी गीताच्या इतिहासाविषयी आणि राष्ट्रीय महत्वाविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमाने महाविद्यालयात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.


प्रताप महाविद्यालय,
स्थापना - १९४५
(स्वायत्त)

8. संविधान दिन कार्यक्रम (26 नोव्हेंबर 2025)

26 नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रसिद्ध वक्ते डॉ. ललित मोमया यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी संविधान कसे नागरिकांचे स्वातंत्र्य आणि न्याय सुरक्षित ठेवते याची सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी व्याख्यानाद्वारे संविधानिक मूल्यांची गतीशील समज प्राप्त केली. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विजय तुंटे आणि डॉ. हेमंत पवार होते. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचा समारोप संविधान मूल्ये जपण्याच्या प्रतिज्ञेने झाला.


प्रताप कॉलेज, अमळनेर
PRATAP COLLEGE, AMALNER
CAREER COUNSELLING CENTER
GPS Map Camera
Amalner, Maharashtra, India
3322+fmx, Galwade Rd, Pratap College Campus, Amalner, Maharashtra 425401, India
Lat 21.05117° Long 75.051858°
Wednesday, 26/11/2025 11:11 AM GMT +05:30
Google

दैनिक **महाराष्ट्र सारथी** शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५

# संविधानिक मूल्य चिरकाल टिकणारे- डॉ.ललित मोमाया यांचे प्रतिपादन

*** प्रताप कॉलेज मध्ये संविधान दिन साजरा * सीसीएमसी, राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांचा संयुक्त उपक्रम**
*** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व २६/११ रोजी शहीद झालेल्यांच्या प्रतिमांना माल्यार्पण**

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा अमळनेर । प्रतिनिधी : (ईश्वर महाजन)**



येथिल खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय अंतर्गत राज्यशास्त्र विभाग, करिअर कौन्सिलिंग सेंटर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ दरम्यान सीसीएमसी हॉल याठिकाणी 'संविधान दिन' मोठया उत्साहात संपन्न झाले. यावेळी विचारमंचावर डॉ.एल एल मोमाया, डॉ.जे बी पटवर्धन, डॉ. एस वाय सोनवणे,डॉ.एच डी जाधव, डॉ.व्ही एस तुंटे उपस्थित होते. प्रारंभी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणि २६/११ रोजी शहीद झालेल्या जवानांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उद्देशपत्रिका व संविधान ग्रंथाचे सुद्धा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संविधानाचे प्रवेशद्वार म्हणजे उद्देशपत्रिका अथवा सरणामा यांचे सामूहिक वाचन डॉ.सुनिल राजपूत यांनी केले आणि विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्साहपूर्वक त्यास प्रतिसाद दिला.

डॉ.ललित मोमाया यांनी मार्गदर्शनपर मनोगतात म्हटले की, संविधान नसते तर अराजकता माजले असते. संविधानिक मूल्य हे समाज पयोगी असून ते प्रत्येकांना जोडणारे आहेत म्हणून भारतीय संविधान हे एकता व अखंडतेच्या दृष्टीने चिरकाल टिकणारे आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.हर्षवर्धन जाधव यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, संविधानामुळे आपण सर्वजण सुरक्षित आहोत,आपणाला हक्कासह कर्तव्याची जाणीव व्हावी याचप्रमाणे जवाबदारीचे भान सुद्धा असणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

प्रस्तुत कार्यक्रम प्रसंगी सिनेट सदस्य डॉ धिरज वैष्णव, डॉ. अमित पाटील, डॉ.निलेश चित्ते, ग्रंथपाल दिपक पाटील, डॉ. धनंजय चौधरी, डॉ.तुषार रजाळे, डॉ.अशोक पाटील, डॉ. ज्ञानेश्वर मराठे,डॉ.रमेश माने, डॉ.किरण सुर्यवंशी, डॉ. अनिल झळके,डॉ.रामदास सुरळकर, क्रीडा संचालक डॉ. सचिन पाटील, डॉ.विलास गावित, डॉ.रवी बाळसकर,डॉ.रविंद्र मराठे, डॉ. हर्ष नेतकर, प्रा. दिलीप तडवी आदी उपस्थित होते. प्रस्तुत कार्यक्रमाच्या यशस्विते साठी डॉ.राखी घरटे,प्रा.हिमांशू गोसावी, प्रा. अमोल अहिरे,पराग रविंद्र पाटील, अतुल धनगर,विशाल अहिरे, नंदू पाटील,धिरज चौधरी, दितेश चिंचोरे,गिरीश पाटील,विशाल पाटील,योगेश चिंचोरे, सुमित चौधरी, गोपाळ पाटील आदींनी सहकार्य केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्र संचालनाची जवाबदारी तसेच आभार करिअर कौंसेलिंग सेंटरचे प्रमुख डॉ.विजय तुंटे यांनी मानले.

## 9 रक्तदान शिबिर

८ डिसेंबर २०२५ रोजी प्रताप कॉलेज, अमळनेर आणि रोटरी क्लब अमळनेर यांच्या संयुक्त विद्‌यमाने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, **एन एस एस** अधिकारी डॉ. हेमंत पवार, NCC अधिकारी डॉ. प्रमोद चौधरी तसेच रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य यांच्या उपस्थितीत शिबिराचा शुभारंभ झाला.

या उपक्रमात **एन एस एस विभागाचा विशेष सक्रिय सहभाग** राहिला. **५० एन एस एस स्वयंसेवकांनी रक्तदान करून** समाजासाठी आदर्श घालून दिला. शिबिराला विद्‌यार्थ्यांसह नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



ग्लोबल महातेज

09 Dec 2025 - Page 1



# रोटरी क्लबतर्फे अमळनेर येथे महारक्तदान शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- रोटरी क्लब व प्रताप महाविद्यालयातर्फे सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी झालेल्या महारक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १०८ जणांनी रक्तदान करून शिबिर यशस्वी केले आहे.

महारक्तदान शिबिरात विद्यार्थी, रोटरी क्लब व अनेक नागरिकांनी सहभाग नोंदविला. प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांच्या हस्ते महारक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी एन. एस. एस. अधिकारी डॉ. हेमंत पवार, एन. सी. सी. अधिकारी डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. धीरज वैष्णव, प्रा. भानुदास गुलाले, प्रा. सोनुसिंग पाटील, प्रा. प्रशांत ठाकूर आदी प्रमुख अतिथी होते. या शिबिरात प्रताप महाविद्यालयात ५० रक्तदाते, तर पीबीए इंग्लिश स्कूलच्या रोटरी हॉल येथे ५८ रक्तदाते असे एकूण १०८ दात्यांनी सहभाग नोंदविला. जीवन श्री ब्लड सेंटर व जीवन ज्योती ब्लड सेंटर धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने ब्लड बँक टीमच्या सदस्यांनी रक्त संकलन केले. रोटरी क्बलचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, सदस्य प्रतीक जैन, अभिजी भंडारकर, अजय रोडगे, रोहित सिंघवी विवेक देशमुख, दिनेश रहेजा, डॉ. राहु मुठे, ताहा बुकवाला, किर्ती कोठारी, महे पाटील, पूनम कोचर, तसेच रोट्रॅक्ट प्रतिनि ध्रुव पारख, निधीश कोचर, कुशल गोलेछा रीशी जैन, वेंकटेश शर्मा, देवेश कोचर फलेश बोथरा यांच्यासह वेदांत कुलकर्णी संतोष पाटील, पूजा कासार, जितेंद्र पाटील हर्ष कायदे, प्रियांका सैंदाणे, रोशनी महाजन हेमांगी महाजन, योगेश महाले, गणेश पाटील आर्दीनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्र घेतले.

## १०८ दात्यांचा उत्स्फूर्त सहभाग